# मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक), नागपूर वनवृत्त, नागपूर यांचे कार्यालय

(बी.एस.एन.एल.,संचारलक्ष्मी बिल्डींग, कस्तूरचंद पार्क समोर, नागपूर-४४० ००१, दूरध्वनी क्र.२५६२२५०, ईमेल-ccfnagpur@mahaforest.gov.in)

विषय :- Forest Land Nagpur
Diversion of 3.064 ha. forest land for construction of 220KV D/C Transmission Line from Umred to Nagbhid under Forest Conservation Act, 1980. (Bramhapuri-2.998 ha. & Nagpur-0.066 ha.)
(FP/MH/TRANS/44469/2020)

क्रमांक कक्ष-10/जमीन/प्र.क्र./1033/ 4029 /2021-22.
नागपूर, दिनांक- 14/03/2022

प्रति,
कार्यकारी अभियंता,
एचव्ही प्राजेक्ट डिवीजन-१,
२ रा माळा, विद्युत भवन,
काटोल रोड, नागपूर

संदर्भ:- 1) प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), म.रा.नागपूर यांचेकडील कार्यालयीन टिपणी क्र कक्ष-23(2)/वजी/ सर्व्हे/ प्र.क्र.188/3066, दिनांक 28/02/2022.
2) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक व केंद्रस्थ अधिकारी, म.रा.नागपूर यांचे पत्र क्र कक्ष-17/नोडल/आयडी 12778/ 2582, दिनांक 02/03/2022.

उपरोक्त संदर्भिय पत्र क्र 1 ची छायांकित प्रत सोबत सहपत्रित करण्यात येत आहे. प्रकरणी पत्रात नमुद केल्याप्रमाणे कार्यवाही करणेबाबत अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक व केंद्रस्थ अधिकारी, म.रा.नागपूर यांचे संदर्भिय पत्र क्र 2 अन्वये कळविलेले आहे.

तसेच सदर प्रस्तावामध्ये ब्रम्हपुरी विभागाकडील 4 व नागपूर वनविभागाकडील 2 गावे असुन प्रस्तावित प्रकल्पाचे क्षेत्र हे व्याघ्र भ्रमण मार्गात येत असल्यामुळे वन्यजीव (संरक्षण) अधिनियम 1972 चे कलम 38 O 1 (g) नुसार त्यास वन्यजीव मंडळाची मान्यता घेणे बंधनकारक आहे असे संदर्भिय पत्र 2 अन्वये अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक व केंद्रस्थ अधिकारी, म.रा.नागपूर यांनी कळविले आहे.

त्या अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, नमुद 6 गांवे हे व्याघ्र भ्रमण मार्गात येत असल्याने प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), म.रा.नागपूर यांनी दिनांक 28/02/2022 रोजीच्या टिपणीत नमुद केल्यानुसार वन्यजीव मान्यता घेण्यासाठी विहीत केलल्या नमुन्यात प्रस्ताव तयार करून उपवनसंरक्षक ब्रम्हपुरी व उपवनसंरक्षक नागपूर वनविभाग यांचेमार्फत सादर करावा.

सहपत्र :- वरिलप्रमाणे

(रंगनाथ नाईकडे)
मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक)
नागपूर वनवृत्त, नागपूर

प्रतिलीपी:- मुख्य वनसंरक्षक चंद्रपुर यांना माहितीस सस्नेह अग्रेषित.
प्रतिलीपी:- उपवनसंरक्षक ब्रम्हपुरी व नागपूर वनविभाग, नागपूर यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी अग्रेषित. त्यांनी प्रकल्प यंत्रणेकडुन प्रस्ताव प्राप्त करून प्रस्ताव या कार्यालयास सादर करावा.

966

Desktop/General 2020-21

Scanned with CamScanner